इचलकरंजी महानगरपालिका, इचलकरंजी

कार्यक्रम पत्रिका क्र. (२/२०२६)

विशेष सभा

प्रति.

दि. ०७/०५/२०२६

मा. -----------------------------------------------------------

नगरसेवक / नगरसेविका,

इचलकरंजी महानगरपालिका, इचलकरंजी

महोदय,

इचलकरंजी महानगरपालिकेच्या मा. सदस्य यांना नोटीस देणेत येते की इचलकरंजी महानगरपालिकेची विशेष सभा मंगळवार दि. १२/०५/२०२६ रोजी दुपारी ०४ : ०० वाजता इचलकरंजी महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीतील भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर सभागृह येथे भरविणेत येत आहे.

तरी सदर सभेस उपस्थित राहणेबद्दल आपणास विनंती करणेत येत आहे.

**************************************************************************************

**परिशिष्ठ**

विषय क्र. १ : इचलकरंजी शहरातील ज्वलंत पाणी प्रश्नावर तसेच सुळकुड पाणी योजना व काळा ओढा व पंचगंगा नदी प्रदुषण, संभाव्य पाणी टंचाई तसेच शहरातील पाणी पुरवठा या विषयावर चर्चा करणेसाठी विशेष सभा बोलविणेबाबत श्री. सतिश वसंतराव मुळीक, स्थायी समिती सभापती व इतर ३ स्थायी समिती सदस्य तसेच उदयसिंग मारुती पाटील, विरोधीपक्ष नेता व इतर १६ सदस्य यांनी मागणी केले कामी कार्यालयाकडुन आलेल्या प्रस्तावावर चर्चा करुन निर्णय घेणे.

---

मा. महापौर, इचलकरंजी महानगरपालिका यांचे
दि. ०७/०५/२०२६ चे आदेशानुसार.

( राहुल बा. पोटे )
प्र.नगरसचिव
इचलकरंजी महानगरपालिका

Scanned with OKEN Scanner

इचलकरंजी महानगरपालिका

मा. महासभा क्र.०२
विशेष सभा

ठराव क्र. ५४
दि. १२/०५/२०२६

विषय क्र. १ : इचलकरंजी शहरातील ज्वलंत पाणी प्रश्नावर तसेच सुळकुड पाणी योजना व काळा ओढा व पंचगंगा नदी प्रदुषण, संभाव्य पाणी टंचाई तसेच शहरातील पाणी पुरवठा या विषयावर चर्चा करणेसाठी विशेष सभा बोलविणेबाबत श्री. सतिश वसंतराव मुळीक, स्थायी समिती सभापती व इतर ३ स्थायी समिती सदस्य तसेच उदयसिंग मारुती पाटील, विरोधीपक्ष नेता व इतर १६ सदस्य यांनी मागणी केले कामी कार्यालयाकडुन आलेल्या प्रस्तावावर चर्चा करुन निर्णय घेणे.

**ठराव**

विषयांकितकामी पंचगंगा नदी प्रदुषण व सध्यस्थितीत शहरात होत असलेल्या पाणी पुरवठा टंचाई तसेच पाणी पुरवठा संबंधी महानगरपालिकेमार्फत सुरु असलेल्या उपाय योजनांचा संक्षिप्त तपशिल खालीलप्रमाणे,

इचलकरंजी महानगरपालिकेमार्फत पाणी पुरवठा सुरळीत करणेच्या दृष्टीने सुरु असलेल्या योजनांचा तपशिल खालीलप्रमाणे,

इचलकरंजी शहर नळ पाणी पुरवठा योजना – दुधगंगा नदी सुळकुड उदभव

इचलकरंजी शहरासाठी कायमस्वरुपी शुध्द व मुबलक पाणी पुरवठा करणेकामी केंद्र शासन पुरस्कृत अमृत २.० योजने अंतर्गत नळ पाणी पुरवठा नगरविकास विभागामार्फत मंजुर करणेत आलेली आहे. सदर योजनेची पार्श्वभुमी व महानगरपालिकेमार्फत केलेल्या कार्यवाहीची क्रमशस्थिती खालीलप्रमाणे,

मा. उपमुख्यमंत्री यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक १८ जून २०२० रोजी बैठकीमध्ये दूधगंगा नदीवरील सुळकुड उद्भव अंतिम करण्यात यावा, मजीप्रा यांनी योजनेचा योग्यता अहवाल, प्रकल्प अहवाल सादर करावा, जलसंपदा विभागाने प्रकल्पासाठी लागणारे आरक्षण दूधगंगा नदीवरून मंजूर करावे, वारणा उद्भव प्रकल्प रद्द करावा, प्रस्तावित दूधगंगा नदीवरील सदर आखणी करण्यात येणारी योजना सुवर्णजयंती नगरोत्थान महाअभियान मधून मंजूर करण्यात यावी असे दिनांक ४ डिसेंबर २०२० रोजी इतिवृत्त प्राप्त झाले.

उप कार्यकारी अभियंता कोल्हापूर पाटबंधारे विभाग उत्तर यांनी दिनांक २५ जून २०२० च्या पत्रान्वये सर्व वापरांती पिण्याचे पाण्यासाठी १.१४७ आ.घ.फु. पाणी उपलब्ध होऊ शकेल असे तत्कालीन नगरपालिकेस कळविले.

उप कार्यकारी अभियंता कोल्हापूर पाटबंधारे विभाग उत्तर यांचे दिनांक २६ जून २०२० चे पत्रान्वये इचलकरंजी शहरासाठी पाण्याची आवश्यकता नमूद करून बंधाऱ्याची साठवन क्षमता १९५ दशलक्ष लिटर असल्याचे कळविले आहे त्यानुसार तीन दिवस पाणी पुरेल असे दिसते असे पूर्व व्यवहार्यता अहवाल साठी पत्र दिले.

मजिप्रा अधीक्षक अभियंता यांनी दिनांक १२ डिसेंबर २०२० रोजी प्रारंभिक तांत्रिक छाननी करून पूर्व व्यवहार्यता अहवाल मान्यता देऊन सविस्तर प्रकल्प अहवाल सादर करण्याचे सुचित केले.

जॅकवेल हेडवर्क आणि बॅक प्रेशर टँक जागा खरेदी करता १९ सप्टेंबर २०२२ रोजी मा.जिल्हाधिकारी कोल्हापूर यांच्याकडे भूसंपादन मान्यतेसाठी प्रस्ताव सादर करण्यात आला.

मुख्य अभियंता मजीप्रा यांनी दिनांक २५ सप्टेंबर २०२२ च्या पत्रानवये र.रु १६५.७० कोटी च्या अंदाजपत्रकास तांत्रिक मंजुरी प्रदान केली.

नगर विकास विभागाकडील दिनांक २९ सप्टेंबर २०२२ चे पत्र तसेच मजीप्रा कडील दिनांक २५ सप्टेंबर २०२२ चे तांत्रिक मान्यतेस अनुसरून अमृत २.० अंतर्गत योजना करण्याबाबत मान्यतेचा महानगरपालिकेचा प्रशासकीय ठराव दि. ४ ऑक्टोबर २०२२ रोजी पारित केला.

मुख्य अभियंता मजीप्रा यांनी दिनांक १३ ऑक्टोबर २०२२ च्या पत्रान्वये आधीची दिलेली तांत्रिक मान्यता रद्द करून फेर सुधारित तांत्रिक मान्यता र.रु १६०.८४ कोटी प्रदान केली.

नगर विकास विभाग कडील शासन निर्णय क्रमांक - अमृत/२०२२/प्र.क्र- २६८ - नवी ३३, दि. ०२ नोव्हेंबर २०२२ च्या शासन निर्णयान्वये राज्यस्तरीय तांत्रिक समितीने १० ऑक्टोबर २०२२ च्या बैठकीमध्ये मंजुरी दिल्याने र.रु १६०.८४ कोटी प्रकल्पाच्या किमतीच्या पाणीपुरवठा प्रकल्पास अमृत २.० अंतर्गत ३३.३३: ३६.६७:३० या आकृतीबंध अंतर्गत प्रशासकीय मान्यता प्रदान केली.

सुळकुड येथे दुधगंगा नदी काठालगतची ३८ गुंठे जागा व सिल्व्हर झोन MIDC येथील ६ गुंठे जागा सदर प्रकल्पासाठी उपलब्ध करुन घेणेकामीचा प्रस्ताव मा.जिल्हाधिकारीसो, कोल्हापुर यांचे मार्फत उपविभागीय अधिकारी कागल व उपविभागीय अधिकारी इचलकरंजी यांचेकडे आवश्यक त्या कार्यवाहीसाठी सादर करणेत आलेला होते. प्रस्तुत प्रकरणी

Scanned with OKEN Scanner

जागा मोजणी साठी आवश्यक असणारी फ़ी महानगरपालिके मार्फ़त भरणा करणेत आलेली आहे. सदरचे दोन्ही प्रस्ताव सद्या प्रलंबीत आहेत.

प्रशासकीय मान्यतेस अनुसरुन याकामी एकुण ३ वेळा फ़ेर निविदा प्रसिध्द करणेत आली. तृतीय फ़ेर निविदा दि.०६/०३/२०२३ ते दि.२०/०३/२०२३ अंती ०२ निविदाकार प्राप्त झाले त्यापैकी १ निविदाकार तांत्रिक छाननी अंती अप्राप्त झाला आहे. दरम्यान सदर योजनेस नागरीकांचा विरोध झाल्याने, अमृत १.० योजनेचा अनुभव पाहता व महानगरपालिकेचे आर्थिक हित लक्षात घेऊन सदरची निविदा प्रकिया प्रलंबित ठेवण्यात आली होती. तथापी दि. १६/०१/२०२४ रोजी केंद्र शासन पुरस्कृत अमृत २.० अभियान आढावा बैठकीमध्ये निविदा प्रक्रिया पुर्ण करणे बाबत सुचना प्राप्त झालेने उर्वरित ०१ निविदाकाराचा वित्तीय लिफ़ाफ़ा दि. १६/०२/२०२४ रोजी उघडण्यात आला असुन सदरची निविदा ही ८.९०% जादा दराची होती. सदरच्या दराबाबत संबंधित मक्तेदार यांना पत्र देवुन दराच्या विश्वासार्हते बाबत विचारणा केली असता संबंधित मक्तेदार यांनी आहे त्या दरामध्ये काम करणे बाबतची तयारी दर्शविली आहे.

सदर कामास दुधगंगा नदीकाठच्या नागरिकांनी विरोध केलेने याप्रकरणी मा.मंत्री, वैद्यकीय शिक्षण व विशेष सहाय्य यांनी दि.२९/०७/२०२३ रोजी जिल्हाधिकारी कार्यालय येथे बैठक घेतली. या बैठकीमध्ये मा. जिल्हाधिकारी यांनी या योजने संदर्भात सर्वांची असणारी मते शासना पर्यंत योग्य पध्दतीने पोचविणेकरिता व या संदर्भामध्ये असणा-या शंकांचे समाधान सर्वांच्या मदतीने मिळुन करणे करिता आयोजित करणेत आलेचे सांगुन सदर योजना ही शासनाने मंजुर केली असुन या बैठकीमध्ये सदर योजनेबाबत निर्णय घेता येणार नाही, याबाबतचे सर्वस्वी अधिकार शासनास असल्याने सर्वांची मते व भावना शासनापर्यंत पोहचविणेचे आश्वासन देवुन सदरचा प्रश्न हा लोकशाही मार्गाने सोडविणेचे आवाहन मा. जिल्हाधिकारी यांनी केले.

विषयांकीत कामी मा.मुख्यमंत्री महोदय यांच्या अध्यक्षतेखाली दि. ११/०९/२०२३ रोजी मंत्रालय मुंबई येथे बैठक आयोजित करणेत आली होती. मात्र काही तांत्रिक कारणास्तव सदरची बैठक रद्द करणेत आली.

उपमुख्यमंत्री मा. ना. अजित पवार यांचे अध्यक्षतेखाली जिल्हाधिकारी कार्यालय कोल्हापूर येथे दि. २९/०१/२०२४ रोजी पार पडलेल्या बैठकीमध्ये मा. उपमुख्यमंत्री यांनी इचलकरंजी शहरास दुधगंगा नदीमधून पाणी उपलब्ध होणेकामी मा. मुख्यमंत्री यांचे अध्यक्षतेखाली बैठक आयोजित करणेकामी सुचीत केले आहे.

मा. प्रधानसचिव (२), नगरविकास विभाग यांना दि. ३०/०१/२०२४ रोजीचे पत्राद्वारे विषयांकीत कामी मा. मुख्यमंत्री यांचे अध्यक्षतेखाली बैठक आयोजीत करणे कामी शासन स्तरावर सकारात्मक निर्णय होणेबाबत विनंती करणेत आली आहे.

सदर योजनेची अंमलबजावणी होणेकामी नागरिकांमार्फ़त, सुळकुड कृती समिति व इतर सामाजिक संस्थांमार्फ़त आमरण उपोषण, आंदोलने केली जात आहेत. अलीकडच्या काळामध्ये सावित्रीच्या लेकी या सामाजिक संस्थेमार्फ़त महिलांनी दि.१९/०२/२०२४ रोजी आमरण उपोषण केले होते. सदरचे उपोषण मा.जिल्हाधिकारी यांनी सदर प्रकरणी मा.मुख्यमंत्री यांच्या अध्यक्षतेखाली बैठक आयोजित करणेचे आश्वासित केलेनंतर तात्पुरते स्थगित करणेत आले आहे. तरी या प्रकरणी शासन स्तरावर सकारात्मक निर्णय होणे आवश्यक वाटते.

मा. मुख्यमंत्री यांचे अध्यक्षतेखाली दि.०१/०३/२०२४ रोजीच्या बैठकीमध्ये दिले आदेशानुसार मा.जिल्हाधिकारीसो, कोल्हापुर यांच्या अध्यक्षतेखाली समिति गठीत करणेत आली आहे. मा.जिल्हाधिकारीसो, कोल्हापुर यांनी तांत्रीक समितीची स्थापना करुन तांत्रिक अहवाल सादर करणेबाबत सुचना दिल्या आहेत.

सदरचा अहवाल तांत्रिक समितीने मा.जिल्हाधिकारीसो यांना दि.०८/०८/२०२४ रोजी सादर केलेला आहे.

मा.जिल्हाधिकारीसो, कोल्हापुर यांचे अध्यक्षतेखालील समितीने सदरचा अहवाल मा.सचिव, नगरविकास विभाग व मा.सचिव, पर्यावरण विभाग, महाराष्ट्र शासन यांना दि.०९/०८/२०२४ रोजी सादर केला आहे.

सदरकामी सादर केले अहवालास अनुसरुन मा. मुख्यमंत्री महोदय यांचे अध्यक्षतेखाली दि. २१/०३/२०२५ रोजी आढावा बैठक पार पडली. या बैठकीमध्ये समितीने सादर केलेल्या अहवालावर सविस्तर चर्चा होवुन यामध्ये पुढील बैठकीमध्ये निर्णय घेणेचे ठरविणेत आले. अदयाप सदरची बैठक प्रलंबित आहे.

याकामी दि. २४/०३/२०२६ रोजी मा. मंत्री महोदय, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग महाराष्ट्र शासन, यांचे अध्यक्षतेखाली बैठक पार पडली. परंतु सदर बैठकीमध्ये याकामी कोणताही निर्णय घेणेत आलेला नाही.

इचलकरंजी शहराकरीता पाणी उपसा यंत्रणेची सध्यस्थिती खालीलप्रमाणे,

इचलकरंजी शहराची लोकसंख्या साधारणत: ३.५० लाख इतकी आहे. इचलकरंजी शहरासाठी दैनंदिन पाणीपुरवठा करणेसाठी सध्या दोन उदभव अनुक्रमे पंचगंगा नदी, इचलकरंजी उदभव व कृष्णा नदी मजरेवाडी उदभव कार्यरत आहेत. पंचगंगा व कृष्णा नदीमधुन सध्या दैनंदिन रित्या इचलकरंजी शहरासाठी उपसा करणेत येत आहे. इचलकरंजी शहरसाठी सध्या सुरु असलेल्या पाणी पुरवठा योजनांचा तपशिल खालीलप्रमाणे,

Scanned with OKEN Scanner

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| १२ | खंजिरे इस्टेट | १५ | १२ | २१५ | सावली सोसायटी, खंजिरे इस्टेट |
| १३ | डी झोन सांगली नाका | १३ | १५ | १५० | पहिला दिवस - सांगली मेन रोड पश्चिमेकडील भाग- आर.के. नगर, सोलगेमळा, केरलेमळा, तेलगु सोसा. पी.बा.पाटील मळा, सा.न. १०२<br>दुसरा दिवस - तोरणा नगर १, तोरणा नगर २, सहकार नगर, येलाज मळा, आसरानगर १,२,३, स्वामी मळा |
| १४ | सी झोन गुरु टाकी (नविन) | २० | १३.५ | १५० | सरस्वती हायस्कुल, मासाळ गल्ली, महावीर सोसायटी, विक्रम नगर |
| १५ | सी झोन गुरु टाकी (जुनी) | १३ | १३.५ | १५० | शास्त्री सोसायटी (नविन- जुनी), आरगे मळा, कापड मार्केट |

वितरण व्यवस्थेमध्ये सुधारणा करणेकामी महानगरपालिकेमार्फत खालील ठळक उपाययोजना राबविणेचे काम चालु आहे.

महाराष्ट्र नगरोत्थान महाभियान अंतर्गत इचलकरंजी शहरांमधील विविध ०६ ठिकाणी उंच पाण्याच्या टाक्या उभारणे.

विषयांकितकामी महाराष्ट्र नगरोत्थान महाभियान सन २०२३-२०२४ अंतर्गत इचलकरंजी शहर पाणी पुरवठा योजना - इचलकरंजी शहरांमधील विविध ०६ ठिकाणी उंच पाण्याच्या टाक्या उभारणे, पंपिंग मशिनरी उभारणे व तदअनुषंगिक कामे करणेचे कामास दि. ०१/०२/२०२४ रोजी नगरविकास विभागामार्फत प्रशासकीय मान्यता मिळालेली आहे. सदर कामाचा कार्यारंभ आदेश दि. १२/०९/२०२५ रोजी देणेत आलेला असुन याकामाची मुदत १८ महिने इतकी निश्चित करणेत आलेली आहे. याकामीचा सर्वसाधारण तपशिल खालीलप्रमाणे,

**सर्वसाधारण गोषावरा**

| अ.क्र. | तपशिल | मंजुर रक्कम रू. |
|---|---|---|
| १ | कामाचे सर्वेक्षण | ०.०५ |
| २ | आर.सी.सी. उंच टाक्या (६) | ८६१.६६ |
| ३ | शुध्द पाण्याची दाबनलिका | ४७७.०९ |
| ४ | शुध्द पाणी उपसा यंत्रे | ३०९.५७ |
| ५ | वितरण | १०००.८२ |
| ६ | चाचणी | ०.३१ |
| ७ | जी.एस.टी | २३८.४९ |
| ८ | MSEB PWD | १००.०० |
| | एकूण | ३१.३७ कोटी |

**भौतिक तपशिल**

| अ.क्र. | ठिकाण | टाकीची क्षमता (लक्ष लिटर) | टाकीची उंची (मीटर) | पंपिंग मशिनरी क्षमता | दाबनलिका | वितरण व्यवस्था लांबी (एकत्रित सहा टाक्यांसाठी) | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | (hp) | संख्या | व्यास (मीमी) | लांबी (मीटर) | व्यास (मीमी) | लांबी |
| १ | पी.वा. पाटील मळा | ११ | २१ | १५ | २ | २५० | २७१० | १०० | १९९७ |
| २ | शांती नगर | १० | २१ | ५० | २ | २५० | ४५० | १५० | ३१८१ |

Scanned with OKEN Scanner

| | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ३ | यशवंत कॉलनी | १४ | २१ | ३० | २ | २५० | १८७० | २०० | ६०५० |
| ४ | जुना चंदुर रोड | ०८ | २१ | ७५ | २ | २०० | ११०० | २५० | ३५२९ |
| ५ | तोरणा नगर | १३ | २१ | १०० | २ | २५० | २०८५ | ३०० | ६०४९ |
| ६ | तुळजाभवानी नगर | १२ | २१ | २०० | २ | २५० | १७६५ | ३५० | २३४ |
| एकुण | ६८ | - | - | - | - | ९९८० | - | २१०४० | |

कामाची सध्यस्थिती :

या कामामधील १. तोरणानगर, २. तुळजाभवानी नगर, ३. शांती नगर या तीन उंच पाण्याच्या टाक्यांचे काम सुरु करणेत आलेले आहे. उर्वरीत तीन पाण्यांच्या टाक्यांचे नकाशे व आराखडे मंजुरी करीता वॉलचंद कॉलेज ऑफ इंजिनिअरींग सांगली यांचेकडे सादर केलेले आहेत. मक्तेदाराने पाईप करीता सादर केलेला QAP दि. १७/११/२०२५ मंजुर करणेत आला असुन पाईपचा पुरवठा मक्तेदारामार्फत करणेत येणार आहे.

लोकशाहिर आण्णाभाऊ साठे दलित वस्ती सुधार योजने अंतर्गत सा.न. १०२ येथे उंच पाण्याची टाकी उभारणेत आली असुन सदरची टाकी मुळ वितरण व्यवस्थेमध्ये जोडणेचे काम सध्या सुरु आहे. सदरचे काम पुर्ण झालेनंतर येत्या १० ते १५ दिवसामध्ये सांगली नाका पाण्याची टाकी, गावभाग पाण्याची टाकी, शहापुर पाण्याची टाकी या टाक्यांचे काही भाग नविन टाकीवर घेणेचे नियोजन करणेत आलेले आहे.

लोकशाहिर आण्णाभाऊ साठे दलित वस्ती सुधार योजने अंतर्गत जलशुध्दीकरण केंद्राकरीता उंच पाण्याची टाकी उभारणेचे काम पुर्ण करणेत आलेले असुन येत्या १५ दिवसामध्ये राजाराम स्टेडीयम उंच पाण्याची टाकी, यशवंत कॉलनी पाण्याची टाकी, बी झोन पाण्याची टाकी या टाक्यांचे काही भाग नविन टाकीवर घेणेचे नियोजन करणेत आलेले आहे.

त्याप्रमाणे संदर्भीय पत्रान्वये मा. सभापती – स्थायी समिती, यांनी सुचविले प्रमाणे काळा ओढा व पंचगंगा नदी प्रदुषण कमी करणेसाठी इचलकरंजी महानगरपालिकेमार्फत सुरु असलेल्या उपाययोजनांचा तपशिल खालीलप्रमाणे,

सध्या इचलकरंजी – पंचगंगा नदीतील प्रदूषणावर प्रभावी उपाययोजना करण्यासाठी इचलकरंजी महानगरपालिकेमार्फत विविध स्तरांवर उपक्रम राबविण्यात येत आहेत. शहरातील नागरीकांसाठी इचलकरंजी महानगरपालिकेमार्फत दैनंदिन एकुण ४० द.ल.लि. पाणी पुरवठा हा पंचगंगा व कृष्णा नदीवर असणा-या पाणी उपसा केंद्राव्दारे उपसा करुन जलशुध्दीकरण केंद्रामध्ये त्या पाण्यावर प्रक्रिया करुन नागरीकांना पुरविणेत येते. वापराअंती एकुण ३८ द.ल.लि. सांडपाणी दैनंदिन रित्या तयार होत आहेत. या घरगुती सांडपाण्यावर शास्त्रोक्त रित्या प्रक्रिया करणेसाठी अनुक्रमे सांगली नाका येथे २० द.ल.लि. व टाकवडे वेस येथे १८ द.ल.लि. असे एकुण ३८ द.ल.लि. क्षमतेचे दोन मलशुध्दीकरण केंद्र अविरतपणे पुर्ण क्षमतेने कार्यान्वित आहेत. या मलशुध्दीकरण केंद्रामध्ये सांडपाण्यावर प्रक्रिया केलेनंतर सांडपाण्याची मात्रा ही केंद्र व राज्य शासनामार्फत ठरवुन दिलेल्या मानकानुसार आहे.

२० दशलक्ष लिटर क्षमतेच्या मलशुद्धीकरण केंद्रातून प्रक्रिया केलेले टाकवडे रोड परिसरातील शेतक-यांमार्फत शेतीसाठी वापरले जात आहे. दररोज २० द.ल.लि. पैकी साधारणत: १५ ते १८ दशलक्ष लिटर पाणी शेतकऱ्यांकडून पंपिंगद्वारे उचलून शेतीसाठी वापरले जाते. उर्वरित सुमारे ३ ते ५ दशलक्ष लिटर पाण्यास क्लोरीन डोसिंग देऊन निर्जंतुकीकरण केल्यानंतर ते नियंत्रित पद्धतीने नाल्याद्वारे सोडण्यात येते.

तसेच १८ दशलक्ष लिटर क्षमतेच्या मलशुद्धीकरण केंद्रातून प्रक्रिया केलेले पाणी टाकवडे वेस, काळा ओढा येथे सोडण्यात येते. या पाण्यावर देखील आसपासचे शेतकरी देखील पंपाव्दारे पाणी उपसा करुन शेती करीत आहेत. या शेतक-यांच्या पंपाचे महावितरण विज देयक हे महानगरपालिकेमार्फत भरणा करणेत येत आहे. त्यानुसार शुद्ध केलेल्या पाण्याचा पुनर्वापरही प्रभावीपणे होत आहे.

अलीकडील काळात पंचगंगा नदीमध्ये वाढलेल्या जलपर्णी मुळे पाण्याचा प्रवाह अडथळित होत असल्याचे निदर्शनास आले होते. याची गंभीर दखल घेत महानगरपालिकेमार्फत नदीपात्रातून मोठ्या प्रमाणावर जलपर्णी काढण्याची मोहीम राबविण्यात आली. काढण्यात आलेल्या जलपर्णीची पर्यावरण पूरक पद्धतीने योग्य विल्हेवाट लावण्यात आली असून नदीपात्र स्वच्छ ठेवण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे.

याशिवाय इचलकरंजी शहरातील काळा ओढा येथे मिसळणाऱ्या सांडपाण्याचे स्रोत शोधून १. आरगे भवन, २. कत्तल खाना शेजारी, ३. आर.बी. पेट्रोल पंप जवळ, ४. दत्तनगर परिसर, ५. डॉ. पांदारे यांचे घराच्या मागील बाजुस, ६. महासत्ता चौक व ७. कलागते कारखाना गावभाग, ही ठिकाणे मलशुद्धीकरण केंद्राच्या प्रक्रियेमध्ये वळविण्याचे काम महानगरपालिकेमार्फत करण्यात आले आहे. त्यामुळे शहरातील सांडपाणी थेट ओढा किंवा नदीमध्ये मिसळण्यास मोठ्या प्रमाणात आळा बसला आहे. सर्व सांडपाणी शुद्धीकरण प्रक्रियेतून गेल्यानंतरच ते सोडले जात असल्याने पर्यावरणीय मानकांचे पालन करण्यात येत आहे.

Scanned with OKEN Scanner

पंचगंगा नदी उदभव -

इचलकरंजी शहरालगत असणा-या पंचगंगा नदीवरुन सन १९६५ मध्ये पंचगंगा पाणी पुरवठा कार्यान्वित करणेत आलेली आहे. सदरचा उदभव हा जलशुध्दीकरण केंद्रापासुन जवळपास ३ क.मी. अंतरावर स्थित आहे. नजिकच्या काळामध्ये या पाणी उपसा केंद्राचे बळकटीकरण करणेत आले असुन एकुण पाईपलाईन पैकी १.५ कि.मी. लांबीची, ७५० मीमी व्यासाची DIK-९ प्रकाराची पाईप लाईन बदलणेचे काम विशिष्ट नागरी सेवा सुविधा पुरविणे या योजने अंतर्गत पुर्ण करणेत आलेले आहे. तसेच पाणी उपसा केंद्रामध्ये ३०० अश्वशक्तीचे दोन पंप नव्याने बसविणे व विदयुत व्यवस्थेचे बळकटीकरण करणे हे काम जिल्हा वार्षिक योजनेअंतर्गत नागरी दलितेत्तर वस्ती सुधार योजने मधुन पुर्ण करणेत आलेले आहे. सदरची दोन्ही बळकटीकरण करणेची कामे करणेपुर्वी पंचगंगा नदीमधुन ९ द.ल.लि. प्रतिदिन या प्रमाणात पाणी पुरवठा करणेत येत होता. सध्या बळकटीकरणानंतर या योजनेमधुन ३५ ते ४० द.ल.लि. दैनंदिन पाणी उपसा करणे शक्य झालेले आहे.

पंचगंगा नदी स्त्रोताजवळील पाणी पातळी कमी झालेनंतर अल्प मुदतीची योजना म्हणुन पंचगंगा जॅकवेलच्या वरील बाजुस साधारणत: १ कि.मी. अंतरावर कट्टीमोळा डोह येथुन पाणी उपसा करणेकरीता योजना महानगरपालिकेमार्फत कार्यान्वित करणेत आलेली आहे. सदर ठिकाणी २०० अश्वशक्ती पंपाव्दारे साधारणत: ९ द.ल.लि. उपसा करणेकरीता यंत्रणा बसविणेत आलेली आहे.

कृष्णा नदी मजरेवाडी उदभव पाणी पुरवठा योजना -

इचलकरंजी शहरासाठी १९९७ साली कृष्णा नदी मजरेवाडी उदभव ग्राहय धरुन योजना कार्यान्वित करणेत आलेली आहे. सदरचा उदभव हा इचलकरंजी जलशुध्दीकरण केंद्रापासुन १८.३३ कि.मी. अंतरावर स्थित आहे. सदरची योजना सन २००१ सालापासुन पुर्ण क्षमतेने कार्यान्वित करणेत आलेली आहे. सदर योजनेची एकुण क्षमता ही ४५ द.ल.लि. इतकी आहे. सदर जलशुध्दीकरण केंद्रामध्ये ५४० अश्वशक्ती क्षमतेचे एकुण ०४ (दोन वर्कींग व दोन स्टँडबाय) पंप बसविणेत आले होते. सध्या या ठिकाणचे एकुण ०२ पंप कार्यरत आहेत.

मुळ योजनेची पाईप लाईन मृदु लोखंड (MS) या प्रकाराची असलेने कालानुरुप सदरची पाईप जीर्ण झालेने वारंवार गळती लागुन शहरातील पाणी पुरवठा होण्याच्या विस्कळीत होणेच्या घटना घडत आहेत. त्यामुळे सदरची पाईप बदलणे अत्यावश्यक होते. त्यानुसार सदरची पाईप एकुण ०३ टप्प्यामध्ये बदलणेचे काम हाती घेणेत आलेले आहे.

| अ.क्र. | योजनेचे नाव | योजनेवरील प्रस्तावित खर्च (कोटी) | प्रस्तावित करणेत आलेल्या पाईपची लांबी (कि.मी.) | बदलणेत आलेल्या पाईपची लांबी (कि.मी.) | पाईप लाईन बदलणेचे काम सुरु असलेल्या पाईपची लांबी (कि.मी.) |
|---|---|---|---|---|---|
| १ | महाराष्ट्र सुजन व निर्मल अभियान सन २०११-१२ | १६.४७ कोटी | ६.६०० | ६.६०० | ०० |
| २ | महाराष्ट्र सुवर्ण जयंती महाभियान सन २०१८-१९ | १६.९८ कोटी | ६.२३५ | ६.२३५ | ०० |
| ३ | महाराष्ट्र सुवर्ण जयंती महाभियान सन २०२२-२३ | २१.११ कोटी | ५.५०० | ४.८४८ | ०.६५२ |
| | एकुण | ५४.५६ कोटी | १८.३३५ | १७.६८४ | ०.६५२ |

P.T.O.

महाराष्ट्र सुजन निर्मल अभियान सन २०११-२०१२ -

महाराष्ट्र सुजन निर्मल अभियान सन २०११-२०१२ अंतर्गत इचलकरंजी शहर पाणी पुरवठा योजनेस दि. १४/०९/२०११ रोजी प्रशासकीय मान्यता मिळाली आहे. सदर प्रशासकीय मान्यतेस अनुसरुन इचलकरंजी शहराच्या कृष्णा नळ पाणी पुरवठा योजनेमध्ये अस्तित्वातील MS प्रकारच्या दाबनलिकेपैकी एकुण ६.६०० मी. लांबीची पाईप लाईन बदलुन ८०० मी.मी. व्यासाची DIK-९ प्रकारची दाबनलिका टाकणेकामी र.रु. १६.४७ कोटी रक्कमेच्या प्रस्तावास प्रशासकीय मान्यता देणेत आली होती. सदर प्रशासकीय मान्यतेनुसार आवश्यक ती सर्व कार्यवाही करणेत आली असुन सदरचे काम पुर्ण करणेत आले आहे.

२. महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाभियान सन २०१८-२०१९ -

Scanned with OKEN Scanner

सन २०१८-२०१९ अंतर्गत महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाभियान योजनेमधील एकुण ६२३५ मी. पाईप लाईन बदलणे करीता र.रु. १६.९८ कोटी रक्कमेच्या प्रस्तावास नगरविकास विभागामार्फत महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाभियान योजनेअंतर्गत दि. ३१/१२/२०१८ रोजी मंजुर होवुन सदरचे सर्व पाईप लाईन बदलणेत आलेली आहे.

महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाभियान सन २०२२-२०२३ -

महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाभियान सन २०२२-२०२३ अंतर्गत कृष्णा नदी पाणी पुरवठा योजनेमधुन मुळ योजनेच्या १८.३३ कि.मी. मधील उर्वरीत अंतिम ५.५ कि.मी. लांबीची पाईप लाईन बदलणे व ५४० अश्वशक्ती HP चे पंप बसविणे करीता र.रु. २१.११ कोटीच्या प्रस्तावास दि. ०१/०३/२०२३ रोजी नगरविकास विभागामार्फत प्रशासकीय मंजुरी देणेत आली. सदर मंजुर कामापैकी ४९४८ मी. पाईप लाईन बदलणेचे काम पुर्ण झाले असुन डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळा ते जलशुध्दीकरण केंद्र दरम्यानची ५५२ मी. पाईप बदलणेचे काम व पंप बदलणेचे काम बाकी आहे.

उर्वरीत पाईप बदलणेचे काम सध्या अंतिम टप्प्यात असुन पाईप बदलल्यानंतर गळत्यांचे प्रमाण अत्यंत कमी असणार आहे. तसेच महानगरपालिकेमार्फत दैनंदिन पाणी उपसा करुन नागरीकांना १ ते २ दिवस आड पाणी पुरवठा करणे शक्य होणार आहे.

३. इचलकरंजी शहर पाणी पुरवठा वितरण व्यवस्था

इचलकरंजी शहर पाणी पुरवठा वितरण व्यवस्थेमध्ये असणा-या उपांगाची माहिती खालीलप्रमाणे,

जलशुध्दीकरण केंद्र- इचलकरंजी महानगरपालिकेकडे एकुण १०८ द.ल.लि. क्षमतेचे जलशुध्दीकरण केंद्र (५४+५४ द.ल.लि.) कार्यान्वित आहे. यापैकी ५४ द.ल.लि. क्षमतेचे जलशुध्दीकरण केंद्र मागील नजिकच्या काळामध्ये UIDSSMT योजनेमधुन बांधणेत आलेले आहे.

उत्प्रेक्षागृह - जलशुध्दीकरण केंद्र येथे पंप हाऊस कार्यान्वित असुन सध्या कार्यान्वित असणा-या १५ उंच पाण्याच्या टाक्यांसाठी एकुण १० पंप कार्यान्वित आहेत. पंपाची क्षमता पुढीलप्रमाणे – १५० (2), २१५, २७५, ६० (3), १२०, १०० (2),

उंच पाण्याच्या टाक्या - इचलकरंजी शहरामध्ये पाणी वितरण करणेसाठी विविध ठिकाणी उंच पाण्याच्या टाक्या उभारणेत आलेल्या आहेत सदर उंच पाण्याच्या टाक्यांचा तपशिल खालीलप्रमाणे,

| अ.क्र. | टाकीचे नाव | टाकीची क्षमता (लाख लि.) | उंची (मिटर) | पंपाची क्षमता (HP) | अख्यात्यारीतील भाग |
|---|---|---|---|---|---|
| १ | ए झोन | २५ | १६ | १२०+६० = १८० | गावभाग, मंगळवार पेठ, महासत्ता चौक व घोडके नगर |
| २ | बी झोन | १६ | १६ | १००+६०= १६० | सुतार मळा आवळे गल्ली, वेताळ पेठ, नेहरु नगर, मेन रोड २ - गांधी कॅम्प, सरस्वती मार्केट , कोल्हापुर रोड १- कामगार चाळ, सिध्दार्थ सोसायटी, कोल्हापुर रोड २- ढवळे हॉस्पिटल, यशवंत प्रोसेस मागील बाजू |
| ३ | थोरात चौक | १५ | १६ | १५० | शांती नगर, लाखे नगर, जाधव मळा, लाल नगर |
| ४ | यशवंत कॉलनी (नविन) | ०६ | १४ | ६० | सुर्वे नगर, योगायोग नगर |
| ५ | यशवंत कॉलनी | १६ | १४ | ६० | पुजारी मळा, यशवंत कॉलनी, कलानगर, |
| ६ | तांबेमाळ (नविन) | १७ | १० | १०० | शेळके मळा, गुरुकन्या मठ, |
| ७ | तांबेमाळ (जुनी) | २४ | १० | १०० | शेळके मळा जुना चंदुर रोड, बरगे पटटी, लोहार गल्ली |
| ८ | नाटयगृह | १३.५ | १२ | ६० | टक्करीचा गावभाग, जयभवानी, माणगावकर बोळ, जैन बस्ती |
| ९ | जवाहरनगर (नविन) | १९ | १८ | २७५ | वाढीव कबनुर, हनुमान नगर, शास्त्री सोसायटी |
| १० | जवाहरनगर | १८ | २१ | २७५ | टाकीचा भाग -२, व्यंकटेश कॉलनी, कोल्हापुर बेकरी, विभुते गल्ली, गणेश नगर एकुण ७ भाग, भारतमाता ३ भाग व वाढीव २ |
| ११ | शहापुर | १८ | २० | २१५ | कृष्णानगर, १-२, दत्तनगर भाटले मळा, गावठान, जावईवाडी |

Scanned with OKEN Scanner

याशिवाय इचलकरंजी शहरातील काळा ओढा येथे मिसळणाऱ्या सांडपाण्याचे स्रोत शोधून १. आरगे भवन, २. कत्तल खाना शेजारी, ३. आर.बी. पेट्रोल पंप जवळ, ४. दत्तनगर परिसर, ५. डॉ. पांदारे यांचे घराच्या मागील बाजुस, ६. महासत्ता चौक व ७. कलागते कारखाना गावभाग, ही ठिकाणे मलशुद्धीकरण केंद्राच्या प्रक्रियेमध्ये वळविण्याचे काम महानगरपालिकेमार्फत करण्यात आले आहे. त्यामुळे शहरातील सांडपाणी थेट ओढा किंवा नदीमध्ये मिसळण्यास मोठ्या प्रमाणात आळा बसला आहे. सर्व सांडपाणी शुद्धीकरण प्रक्रियेतून गेल्यानंतरच ते सोडले जात असल्याने पर्यावरणीय मानकांचे पालन करण्यात येत आहे.

पंचगंगा नदी व परिसरातील जलस्रोत स्वच्छ ठेवण्यासाठी तसेच प्रदूषण कमी करण्यासाठी इचलकरंजी महानगरपालिका कटिबद्ध असून भविष्यातही अशा उपाययोजना अधिक प्रभावीपणे राबविण्यात येणार असल्याचे महानगरपालिकेमार्फत येणार आहेत. या अंतर्गत सध्या भुयारी गटार योजनेचे काम सुरु असुन यामध्ये १९.५ व १३ असे एकुण ३२.५ द.ल.लि. क्षमतेचे दोन मलशुध्दीकरण केंद्र उभारणेचे काम महानगरपालिकेमार्फत सुरु आहे.

नदी संवर्धन, सांडपाणी व्यवस्थापन आणि शुद्ध केलेल्या पाण्याचा पुनर्वापर या तिन्ही बाबींवर भर देऊन शहरातील पर्यावरणीय स्थिती सुधारण्यासाठी सातत्याने प्रयत्न सुरू आहेत. याप्रमाणे कार्यालयाने महासभेमसमोर सविस्तर प्रस्ताव सादर केला आहे. सदरचा प्रस्ताव वाचणेत आला.

तरी इचलकरंजी शहराला नियमित व शुद्ध पाणीपुरवठा होणेसाठी मंजुर असलेली सुळकुड योजना पुर्ण करणेसाठी अथवा मा. शासनाकडुन अन्य पाणीपुरवठा योजना मंजुर होणार असेल तर त्यासाठी शासकीय स्तरावर आवश्यक पाठपुरावा करणेस मंजुरी देणेत येत आहे.

सूचक : A. P. Bachate सौ. अ. प्र. बचाटे.

अनुमोदक : [signature] स. व. मुळीक.

ठराव सर्वानुमते मंजुर

[signature]

महापौर

इचलकरंजी महानगरपालिका

Scanned with OKEN Scanner